Publication: Pudhari
Date: 29/12/2019
Page: 2
Column: 3-6

पुढारी मुंबई, रविवार, २९ डिसेंबर २०१९

# ‘मेरी संगिनी मेरी मार्गदर्शिका’ अभियान सुरू




मुंबई : अदानी फाऊंडेशनच्या मेरी संगिनी मेरी मार्गदर्शिका उपक्रमात सहभागी झालेल्या या काही महिला.

## अदानी फाऊंडेशनचा उपक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

अदानी इलेक्ट्रिसिटीने अदानी फाऊंडेशनसोबत ‘मेरी संगिनी मेरी मार्गदर्शिका’ या अभियानाची सुरुवात मुंबईतील आरे कॉलनी येथे शुक्रवारी केली. अदानी फाऊंडेशनच्या संचालिका सुषमा ओझा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. या अभियानात महिला सशक्तीकरणासाठी समाजातून महिला नेतृत्त्व तयार केले जाणार आहे. या अभियानाबाबत सांगताना सुषमा ओझा म्हणाल्या की, समाजातील महिलांना नेतृत्त्व गुण शिकवण्यासाठी हा प्रकल्प राबवला जाणार आहे. या प्रकल्पातून समाजात निर्माण होणाऱ्या कार्यकर्त्या संगिनी गरजूंचे समुपदेशन करतील. तसेच घरेलू हिंसेसारख्या सामाजिक समस्यांवर संगिनी काम करतील. तसे प्रशिक्षण त्यांना दिले जाईल. याशिवाय शासकीय यंत्रणा व योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम या संगिनी करणार आहेत.